फिर्याद

मुंबईनाका पोलीस ठाणे, नाशिक शहर
दिनांक २०/०५/२०१९

मी अक्षय रविंद्र ओहोळ, वय २४ वर्षे व्यवसाय - शिक्षण, रा. लोकमान्य नगर, सिंधुतिर्थ अपार्टमेंट, नाशिकरोड, नाशिक मो.नं. ८००७२०६००१

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहत असुन मी शिक्षण घेत असुन, माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह करणेकामी मी सावकारी व्यवसायाचा परवाना मिळणेकामी उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, नाशिक यांचेकडे ऑनलाईन अर्ज केला होता. परंतु यावर कोणतीही कारवाई न झाल्याने ३ मार्च २०१९ रोजी माहिती अधिकार कायदयानुसार अर्ज केला होता. त्यानंतर दि. ३०/०३/२०१९ रोजी प्रकाश शिंपी सहकार अधिकारी तालुका सहकारी संस्था कार्यालय, नाशिक यांनी माझा मो.क्र. ८००७२०६००१ वर त्यांचा मोबाईल क्र. ९५९८८६०७५१५ वरुन मला फोन करुन त्यांच्या कार्यालयात बोलावले. मी त्याच दिवशी कार्यालयात जावुन त्यांची भेट घेतली. त्यांनी मला करवंदे नावाच्या इसमाचा मो.क्र. ७७२००५२५८० दिला व त्यांच्याशी संपर्क साधुन ते सांगतील त्याप्रमाणे पैशाची पुर्तता करुन देण्यास सांगीतले त्यानुसार मी त्याच दिवशी श्री करवंदे यांच्याशी संपर्क साधुन बोधले नगर येथील त्यांच्या कार्यालयात भेट घेतली असता, त्यांनी मला सांगीतले की, तुमचे पॅनकार्ड, आधारकार्ड व ५०,०००/- रू. आणुन दया त्यानंतर मी साहेबांशी बोलतो. मी पुन्हा प्रकाश शिंपी यांची भेट घेतली असता, त्यांनी सांगीतले की, करवंदे एजंट यांनी सांगीतले प्रमाणे पुर्तता करा. त्यानंतर तुमचे सावकारी परवाण्याचे काम होईल. असे सांगीतले त्यानंतर मी २०/०४/२०१९ रोजी प्रथम अपील अर्ज ऑनलाईन केला त्यावर अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. म्हणुन मी दि. ०६/०४/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक या कार्यालयाचे वेबसाईट वर ऑनलाईन तक्रार केली होती. त्यानुसार मला दि. १७/०५/२०१९ रोजी श्री प्रभाकर घाडगे पोलीस उप अधिक्षक यांनी माझे मोबाईलवर संपर्क साधुन मला त्यांचे कार्यालयात तक्रार देण्याकरीता बोलाविले. त्याप्रमाणे मी दि. १७/०५/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात जावुन, श्री प्रभाकर घाडगे, पोलीस उप अधिक्षक यांची भेट घेतली त्यांना माझी वरील नमुद प्रमाणे तक्रार तोंडी सांगीतली. त्यांनी विभागीय कार्यालय नाशिक पुर्व विभाग, महानगरपालिका नाशिक यांना सापळा कारवाई करीता दोन पंच उपलब्ध करुन देणेबाबत लेखी पत्र दिले त्यानुसार विभागीय कार्यालय, नाशिक पुर्व विभाग येथील दोन पंच श्री दिलीप कळमकर व श्रीमती इंदुमती सातपुते हे त्यांच्या वरिष्ठांच्या आदेशाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे हजर झाले. श्री प्रभाकर घाडगे यांनी माझी व दोन्ही पंचांची ओळख करुन दिली. पंचासमक्ष मी माझी तक्रार तोंडी सांगीतली. त्यानंतर माझे स्वहस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली. पंचांनी माझी तक्रार वाचुन पाहिली व त्यावर तक्रारदार म्हणुन मी सही केली व समक्ष म्हणुन श्री प्रभाकर घाडगे, पोलीस उप अधिक्षक यांनी सही केली व त्याखाली दोन्ही पंचांनी सहया केल्या.

शासकिय कार्यालयांना शनिवार व रविवार दोन दिवस सुट्टी असल्याने त्यांनी मला दि. २०/०५/२०१९ रोजी माझे तक्रारीप्रमाणे कारवाई करणेकामी ला.प्र.वि. कार्यालय, नाशिक येथे सकाळी ११.०० वा हजर राहणेबाबत सुचना दिली. त्याप्रमाणे मी माझेकडील दुचाकी वाहनासह दि. २०/०५/२०१९ रोजी ला.प्र.वि. कार्यालय, नाशिक येथे आलो. तेथे पोलीस उप अधिक्षक श्री प्रभाकर घाडगे हे सापळा पथकासह हजर होते. त्यांनी मला त्यांचे कार्यालयात बसवुन श्री प्रभाकर घाडगे यांनी त्यांचे सापळा पथकातील पंच श्री दिलीप निवृत्ती कळमकर व श्रीमती इंदुमती मारुती सातपुते तसेच सापळा पथकातील पोना प्रकाश डोंगरे, पोकॉ शाम पाटील, पोकॉ नितीन डावखर अशांचा परिचय करुन देवुन माझा ही परिचय सर्वांना करुन दिला. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्री प्रभाकर घाडगे यांनी मी दि. १७/०५/२०१९ रोजी दिलेली तक्रार मला वाचण्यास दिली त्यावर माझी व पोलीस उप अधिक्षक श्री घाडगे यांची सही आहे.

त्यानंतर माझे तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे सहकार अधिकारी श्री शिंपी हे खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याकरीता मला व पंच नं. १ श्री कळमकर असे आम्हाला पोलीस उप अधिक्षक श्री प्रभाकर घाडगे यांनी योग्य त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते माझेकडे देवुन मला पंच नं. १ श्री कळमकर यांचेसह माझेकडील एमएच १५ सीपी ३४५१ या दुचाकी वाहनाने उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक तालुका नाशिक कार्यालयात श्री शिंपी यांचे भेटीसाठी रवाना केले. मी श्री शिंपी यांची पंचासमक्ष भेट घेतली असता, सहकार अधिकारी श्री शिंपी यांनी सावकारी परवाना मंजूरीकरीता तडजोडीअंती माझेकडे ४० हजार रूपयांची मागणी पंच नं. १ श्री कळमकर यांचे समक्ष केली.

त्यानंतर आम्ही, पोलीस उप अधिक्षक श्री घाडगे व सापळा पथक असे ला.प्र.वि. नाशिक कार्यालयात परत आलो. तेव्हा श्री घाडगे यांनी पंच नं. २ श्रीमती सातपुते, पोना डोंगरे व पोकॉ शाम पाटील, पोकॉ नितीन डावखर यांचेसमक्ष पंच नं. १ व माझेकडुन घडलेली हकीगत ऐकुन घेतली व व्हाईस रेकॉर्डर मधील श्री शिंपी व माझे संभाषण ऐकले असता श्री शिंपी यांनी लाचेची मागणी केली असल्याची खात्री केली त्यानंतर पुढील कार्यवाही करणेकामी पोलीस उप अधिक्षक श्री प्रभाकर घाडगे यांचे सापळा पथकाने पडंताळणी पंचनामा केला.

त्यानंतर मला श्री शिंपी यांना लाच म्हणुन देण्यासाठीची २०,०००/- रू. रक्कम हजर करण्यास सांगीतली, मी माझ्या जवळील २ हजार रूपये दराच्या दहा नोटा असे एकुण २०,०००/- रू. हजर केले. त्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावण्याचे प्रात्यक्षीक श्री डावखर यांनी दाखविले. त्यानंतर अ.पा. लावलेल्या नोटा माझे शर्टाच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेवल्या व पोलीस उप अधिक्षक श्री घाडगे यांनी मला लाचेच्या सापळयाबाबत योग्य त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन पंच नं. १ श्री कळमकर यांना माझे सोबत योग्य त्या सुचना देवुन श्री शिंपी यांना लाचेची रक्कम देण्याकरीता माझ्याकडील दुचाकी वाहनाने रवाना केले व आमचे पाठोपाठ पोलीस उप अधिक्षक श्री घाडगे व सापळा पथक शासकिय वाहनाने मुंबईनाका कडुन सारडा सर्कल कडे जाणाऱ्या रस्त्यावर उपनिबंधक सहकारी संस्था नाशिक तालुका नाशिक कार्यालयासामोर आपले अस्तित्व लपवुन सापळा लावला. मी व पंच नं. १ श्री कळमकर यांचेसह श्री शिंदे यांचे कार्यालयात गेलो असता, त्यांची भेट घेतली असता त्यानी माझे कडुन दाखला मिळणेबाबत अर्ज लिहुन घेवुन माझेकडील २० हजार रू. लाचेची रक्कम त्यांचे टेबलवर असलेल्या माहिती अधिकार रजिस्टर मध्ये ठेवण्यास सांगीतले. मी लाचेची रक्कम सदर रजिस्टरमध्ये ठेवली व ठरल्याप्रमाणे सदर कार्यालयाचे बाहेर येवुन श्री शिंपी यांनी लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा सापळा पथकास केला असता, सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी तसेच पंच क्र. २ हे तात्काळ शिंपी यांचे कार्यालयात आले व त्यांना ताब्यात घेतले. तसेच पंच नं. १ श्री कळमकर यांना श्री शिंपी यांनी पैसे कुठे ठेवले आहेत याबाबत विचारले असता त्यांनी सांगीतले की श्री शिंपी यांनी त्यांचे टेबलवरील माहिती अधिकार रजिस्टरमध्ये लाचेची रक्कम ठेवल्याचे सांगीतले. तेव्हा पंच नं. २ श्रीमती सातपुते यांना त्यांचे माहिती अधिकार रजिस्टरमधील लाचेची रक्कम काढण्यास सांगुन पडताळणी पंचनाम्याप्रमाणे नमुद नोटांची खात्री करून सदर रक्कम ताब्यात घेतली.

आज दि. २०/०५/२०१९ रोजी श्री प्रकाश रामदास शिंपी, सहकार अधिकारी, उपनिबंधक सहाकारी संस्था नाशिक तालुका नाशिक यांनी मला सावकारी व्यवसायाचा परवाना देण्याकरीता स्वत:चे पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन स्वत:चा सांपत्तीक फायदा करुन घेण्याचे हेतुने कायदेशीर परिश्रमाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन ४०,०००/- लाचेची मागणी पंचासमक्ष करुन त्यापैकी २०,०००/- रू. लाचेची रक्कम १७:४० वा. पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे सुधारीत अधिनियम २०१८ चे कलम ७ प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील संगणीकृत फिर्याद मी वाचुन पाहिली असुन ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

पोलीस ठाणे अंमलदार
मुंबई नाका पोलीस स्टेशन
नाशिक शहर

हि फिर्याद लिहुन दिली

FORM- 1A N.C.R.B.

I.I.F.-1

# पहिली खबर
## First Information Report

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C )

1233

१. राज्य ...... जिल्हा ...... पोलीस ठाणे ...... पहिली खबर क्र. ...... वर्षे २०१९ दिनांक २०-५-२०१९
State महाराष्ट्र District नाशिक शहर Police Station ...... FIR No. ....../२०१९ Year Date

२. (i) अधिनियम Act ...... कलमे Sections ......
(ii) अधिनियम Act ...... कलमे Sections ......
(iii) इतर अधिनियम व कलमे Others Acts and Section ......

३. (a) अपराधाची घटना : वार ...... तारीख पासून ...... वेळ ...... तारीख पर्यंत ...... वेळ ......
Occurrence of Offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Time applicable portion )

3. 1) 00.00 ते 03.00 2) 03.00 ते 06.00 3) 06.00 ते 09.00 4) 09.00 ते 12.00 5) 12.00 ते 15.00
6) 15.00 ते 18.00 7) 18.00 ते 21.00 8) 21.00 ते 24.00 9) 06.00 ते 18.00 10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख २०-५-२०१९ वेळ २३.२२ वा
Information received at P.S. Date Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ......१९/२०१९ तारीख २०-५-२०१९ वेळ २३.२२ वा
General Diary Reference : Entry No Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ...... लेखी / तोंडी Written / Oral ......

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ...... चौकी/बीट/दुरुक्षेत्र नावं व क्रमांक ......
Place of occurence : (a) Direction and distance from P.S ...... Chouki/ Beat/ O.P Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाण नाव ...... ठिकाणाचे नंबर ...... गल्ली ...... रस्त्याचे नाव ......
Adress of Occurrence Name ...... No. if any ...... Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण ...... गाव ...... पोस्ट ...... तालुका ...... जिल्हा ...... राज्य ......
Nearest identifiable Place : Village ...... Post Taluka Dist नाशिक State महाराष्ट्र
(c) पोलीस ठाणेचे हददीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ...... तालुका ...... जिल्हा ...... राज्य ......
In case , Outside the limit of this Police Station Taluka Dist State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complaint/ Informant : Permanent Adress
(a) नाव ...... (b) वडिलांचे / पतीचे नाव ......
Name ...... Father's / Husbands Name ......
(c) जन्म तारीख व वय ...... (d) राष्ट्रीयत्व ...... फोन नं ......
Date of Birth & Age ...... Nationality भारतीय Phone No
(e) पारपत्र क्रमांक ...... दिल्याची दिनांक ...... दिल्याचे ठिकाण ...... (f) व्यवसाय ......
Passport No Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion ...... जात Caste ...... जन जात Sub caste ......
(h) पत्ता : गल्ली/सर्वे नं ...... घर /नाव नंबर ...... फोन/मो. नं ...... पॅनं नं ...... ओटर्स नं ......
Address : Ward ...... House/Name No ...... Phone/M No ...... Pan No Card No
रस्त्याचे नाव ...... जवळचे प्रसिध्द ठिकाण ...... गाव ...... पोस्ट ...... पो. स्टे ......
Road Nearest Identifiable place Village नाशिक Post PStn.
तालुका ...... जिल्हा ...... राज्य ...... सध्याचा पत्ता ......
Taluka Dist नाशिक State महाराष्ट्र Present Addresss ......

7. माहिती असलेल्या आरोपींचे संपूर्ण नाव पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I-B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलचा जोडावे.)
Details Name & Address of Known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form I-B of attach FIR I-B to case diary )
......
......

शा.मु.औ (के) २०३-(५,०००पुस्तके)-१+२०५०

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबनाची कारणे ......
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या /अंतर्भुत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकुर पाठीमागे लिहावे
Particulars of properties stolen and involved ( Attach necessary Proform) write down details on blank back page.
......

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मुल्य ......
Total value of properties stolen/involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover properties) ......

11. अकस्मात मृत्यु / अपघाती मृत्यु असल्यास त्याचा क्रमांक ......
Unnatural/ Accident Death. Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
F.I.R. Information brief Content (Attach separate sheets, if required ) : Detail Write down back blank page.
......
......

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरुन कॉलम नं. 2. मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ......
2. तपास नाकारण्यात आला. त्याचे कारण. ......
3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... जिल्हा ...... राज्य ......
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I. O.) ...... Rank ...... No ...... to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to ...... (3)Transferred to P.S. ......
District ...... on point of jurisdiction.
तक्रारदाराने/फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R read over to the Complaint / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complaint/ informant, free of cost
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer Incharge, Police Station
संपूर्ण नाव Name ......
पदनाम Rank ......
तपासिक अं. चा कोड क्र. ......
Posting.
Code No. of I. O. ......

15. १. न्यायालयात सरदर केल्याची तारीख ......
1. Date and Time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधिक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार , 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complaint, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy

Attachment to item 7 of First Information Report (के) -Form- 1- A